# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी -४ महाराष्ट्र विपीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनिम क्रमांक (६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभाग

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पेक्स, गडचिरोली ४४२६०५
फोन /फॅक्स नंबर ०७१३२ - २२३१०४
Email-development.section@unigug.ac.in
Web: unigug.ac.in

**जा.क्र./गोंवि /मविविवि/** 1335/२०२५

**दिनांक :** 03 /09/२०२५
**स्मरणपत्र**

**प्रति,**

मा. संस्था अध्यक्ष / सचिव / प्राचार्य
विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**विषय :- शैक्षणिक सत्र २०२४-२५ या वर्षाचे वार्षिक अहवालाकरीता माहिती सादर करणेबाबत.**
**संदर्भ :- विद्यापीठाचे पत्र जा.क्र/गोंवि/मविविवि/९३०/२०२५ दि.२४/७/२०२५**

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषयांन्वये आपणास कळविण्यात येते की, विद्यापीठाचे शैक्षणिक सत्र २०२४-२५ या वर्षाचा वार्षिक अहवाल तयार करावयाच्या अनुषंगाने दि. १ जुलै २०२४ ते दि. ३० जुन २०२५ या कालावधीतील वार्षिक अहवालाकरीता महाविद्यालयांची प्रपत्र क्र.१ ते ६ ची माहिती मराठी मध्ये Soft Copy Word File ISM Font (DVBW-TTSurekh) इंग्रजी Time New Roman मध्ये सादर करण्यास संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात आले आहे. परंतु अनेक महाविद्यालयाने माहिती Krutidev Font मध्ये सादर करीत आहे असे लक्षात आलेले आहे. सदर महाविद्यालयांनी माहिती विद्यापीठाने दिलेल्या Font मध्ये सादर करावी. तसेच ज्या महाविद्यालयाची माहिती अद्यापर्यंत अप्राप्त आहे, अशा महाविद्यालयांनी दि.१० सप्टेंबर २०२५ पर्यंत माहिती development.section@unigug.ac.in या ई-मेलवर सादर करावी व Hard Copy विद्यापीठाच्या आवक जावक विभागात सादर करावी. या अनुषंगाने आपणास पुनश्च: या पत्रान्वये कळविण्यात येते की मराठी भाषेतील माहिती Soft Copy Word file (PDF नसलेले) ही ISM Font मध्ये व इंग्रजी भाषेतील माहिती Time New Roman मध्ये सादर करावी. तसेच प्रपत्र १ ते ६ मध्ये दिलेल्या प्रपत्रामध्ये इंग्रजी व मराठी अशी दोन्ही भाषेमध्ये माहिती सादर करणे बंधनकारक आहे तसेच मराठी भाषेतील अहवालाची माहिती दुसऱ्या Font मध्ये स्विकारल्या जाणार नाही.

करीता सदर माहिती उपलब्ध करुन न दिल्यास शैक्षणिक सत्र २०२४-२५ या वर्षाचे वार्षिक अहवाला मध्ये आपल्या महाविद्यालयाच्या माहितीचा समावेश न झाल्यास संपूर्ण जबाबदारी संबंधीत महाविद्यालयांची राहील तसेच मा. व्यवस्थापन परिषदेच्या निर्णयानुसार शास्ती लादण्यात येईल.

करीता यांची नोंद घ्यावी.

**संलग्नित सहपत्र :प्रपत्र ०१ ते ०६**

**मा. प्र-कुलगुरू महोदयांच्या मान्यतेने,**

सहाय्यक कुलसचिव,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतिलिपी:-**

१) मा. कुलगुरू महोदयांचे स्वीय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
२) मा. प्र-कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३) मा. कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोल